जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १३५ दिनांक - २६/०२/२०२४**

वारजे माळवाडी पोलिस स्टेशन पुणे शहर

## गाडीला ओव्हरटेक केल्याचा राग धरून एकास बेदम मारहाण केल्याने ४ इसमांना केले अटक

दि.२१/०१/२०२४ रोजी फिर्यादी हे त्यांचे कडील चारचाकी वाहनाने फातीमानगर,हडपसर येथील त्यांचे कामावरून घरी परत जात असताना वारजे माळवाडी पोलीस स्टेशन हद्दितील आर.एम.डी.कॉलेज समोरील गार्डन सिटी चौक येथील वळणावर त्यांचे पुढे चालणारे दुचाकीस्वार रस्त्याचे मधून मोटार सायकल चालवित होते.म्हणून फिर्यादी यांनी हॉर्न वाजवून त्यांना बाजूला होण्याचा इशारा केला व निघून गेले. दुचाकीस्वारांना त्याचा राग आल्याने त्यांनी फिर्यादी यांचे चारचाकी वाहनाचा पाठलाग करत फिर्यादी राहत असलेल्या सोसायटी पर्यंत त्यांचा पाठलाग करून सोसायटीचे गेट समोर त्यांची गाडी आडवून दुचाकी वरील चार इसमांनी फिर्यादी यांना हाताने व वीटांनी मारहाण करून त्यांचे कपाळास व बरगडी फ्रॅक्चर करून जबर जखमी करून पळून गेले. त्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने वारजे माळवाडी पो.स्टे.गुरनं ७७/२०२४ भादंवि.कलम ३२६,३२३,५०४,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास करत असताना वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे तपास पथकाने घटना स्थळावरील सीसीटिव्ही कॅमेरे तपासले असता तपास पथकातील पोलिस अंमलदार अजय कामठे यांनी कॅमेऱ्यातील फुटेज मधील दुचाकीस्वार हे वारजे येथील म्हाडा वसाहती मध्ये राहणारे असल्याचे ओळखले. त्यावरून १) **इरफान करीम शेख वय १९ वर्षे,रा.फ्लॅटनं १०९,बिल्डिंगनंई/पावना,म्हाडा वसाहत,वारजे पुणे व २) अजय विठ्ठल खरात, वय १९ वर्षे,रा.फ्लॅटनं ३१६,बिल्डिंगनंई/मुठा,म्हाडा वसाहत, वारजे पुणे** यांना ताब्यात घेवून दाखल गुन्ह्यात अटक केले आहे.त्यांचे सोबत आणखी ०२ अल्पवयीन बालकांना देखील ताब्यात घेतले आहे.अधिक तपास सहा.पोलीस निरीक्षक अमोघ ओलेकर करत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उपआयुक्त,परिमंडळ ३,पुणे शहर श्री.संभाजी कदम, मा.सहा. पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग, पुणे शहर.श्री.भिमराव टेळे, यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मनोज शेडगे, तपास पथक प्रभारी अधिकारी पोउपनिरी रामेश्वर पार्वे व त्यांचे पथकातील अंमलदार पोलिस अमंलदार प्रदिप शेलार, भुजंग इंगळे,विजय भुरुक,श्रीकांत भांगरे,संभाजी दराडे,विक्रम खिलारी,अजय कामठे व सत्यजित लोंढे यांनी केली आहे.